# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील रद्दी पेपर विक्रीसंदर्भात...

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील "अ" वर्ग कोरे फॉर्म्स, वर्तमानपत्रे, नियतकालिके, अहवाल, इत्यादी तसेच अन्य प्रकाशने व "ड" वर्ग (किरकोळ कागद वा रद्दी कचरा) रद्दी विक्रीसाठी बृहन्मुंबईतील इच्छुक ठेकेदारांकडून रद्दी उचलण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके भरताना "अ" वर्ग रद्दीसाठी रुपये ४०,०००/- व "ड" वर्ग रद्दीसाठी रुपये ३५,०००/- रिझर्व्ह बॅकेत कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई -४०००३२ यांचे नावे **"लेखाशीर्ष ८४४३, महसुली नागरी ठेव"** असे चलनावर नमूद करुन चलनाच्या उजव्या बाजूच्या वरील भागावर **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक ००६००५, लेखाशीर्ष संकेतांक ८४४३५०२९०१"** नमूद करुन चलनाद्वारे पैसे भरावेत. चलन व चलनाची छायांकित प्रत व रद्दीचे दरपत्र मोहोरबंद करुन **सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई -४०० ०३२** या पत्त्यावर "अ" वर्ग रद्दी दरपत्रक, "ड" वर्ग रद्दी दरपत्रक असा उल्लेख करुन **मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी** दुपारी ०२.०० वाजेपर्यंत दरपत्रके पाठवावीत. रद्दीची "अ" व "ड" वर्गाची अनामत रक्कम स्वतंत्र चलनाने भरावी. तसेच 'अ' व 'ड' वर्ग या दोन्ही वर्गाच्या अनामत रक्कमा जमा करणाऱ्या ठेकेदारांचाच रद्दी ठेकेदासाठी विचार करण्यात येईल. निविदेसंदर्भातील अन्य अटी व शर्ती संदर्भातील माहिती **या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर** तसेच कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, कक्ष क्र.०१७, तळ मजला, विधान भवन, मुंबई यांचेकडे उपलब्ध असून निविदाकाराने निविदा/दरपत्रक सादर करताना खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

ठेकेदारांनी दरपत्रकांसोबत खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१) GST नोंदणी क्रमांक
२) आयकर तपशिल (मागील तीन वर्षातील २०२१-२०२२, २०२२-२०२३, २०२३-२०२४)
३) पॅन कार्डची छायांकित प्रत.
४) मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम-१३४ अनुषंगिक महापालिकेच्या लायसन्स डिपार्टमेंटचे प्रमाणपत्र जोडावे लागेल.
५) रद्दी विक्रीमधील वार्षिक उलाढाल रु.५ लाखांपेक्षा जास्त असणे आवश्यक असून त्यासंदर्भातील कागदपत्र जोडावे लागतील
६) शासकीय/निमशासकीय कार्यालयात रद्दीचा ठेका मिळाला असल्यासंदर्भातील अनुभवाचे प्रमाणपत्र

विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांसंदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे असतील.

**सचिव-१ (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई.**